(11) Dr. Kailas Sawant (History)

ijindex
digital directory of Indian journals

ISSN 2277 - 7539 (Print)
Impact Factor - 5.631 (SJIF)

# Excel's International Journal of Social Science & Humanities

An International Peer Reviewed Journal

June - 2021
Vol. I No. 18

## Social Vital Issues

Editor

Dr. Nandkumar N. Kumbharikar

Co - Editor

Dr. Laxman. K. Ulgade
Dr. Balaji. A. Sable

EXCEL PUBLICATION HOUSE
AURANGABAD

ijindex

ISSN 2277 - 7539 (Print)
Impact Factor - 5.631 (SJIF)

# Excel's International Journal of Social Science & Humanities

**An International Peer Reviewed Journal**

**June - 2021**

**Vol. I No. 18**

**Editor**

***Dr. Nandkumar N. Kumbharikar***
Dept. of Public Administration
SPP College, Sirsala, Dist. Beed.
Emaill - dr.kumbharikarnn@gmail.com

**Co-Editor**

***Dr. Laxman K. Ulgade***
Head.Dept. of Public Administration
Havagiswami College, Udgir, Dist. Latur

***Dr.Balaji A. Sable***
Head.Dept. of Economics
SPP College, Sirsala, Dist. Beed.

**Excel Publication House**

**Aurangabad**

# Index



| Sr. No. | Name | Title Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Dr. C.B.Kanase | Indian theatre during the covid-19: an analysis | 5 |
| 2 | Mrs.Neelam A.Saswade | Feminist theory in amitav ghosh's novels | 10 |
| 3 | Dr. Chate Madhukar Shivaji | A study on physiology and physical fitness among volleyball and handball players | 13 |
| 4 | Dr Bharat Haribhau Chapke | Qualities of Physical Instructor for Well Performance: An analysis | 16 |
| 5 | Dr. A. D. Tekale | Impact of the covid19 pandemic on sports sector: an overview | 19 |
| 6 | Dr. Aiyaz Hussain Shaikh | co-relation of physiological and fitness performance on pre-university girls of Pune district | 23 |
| 7 | Prof. Vijay Deshmukh | Sports injuries and sports rehabilitation | 25 |
| 8 | Dr.Deshmukh S.B. | Environment after covid 19: A geographical study | 30 |
| 9 | Dr.Doke A.T. | Watershed management: principles and practices | 33 |
| 10 | Dr. Sd. Rafat Ali Osman Ali | Disaster management and media | 36 |
| 11 | Dr.Gaikwad.J.R. | A study of causes, consequences and impact of global warming: geographical view | 40 |
| 12 | Dr. SK.MD. Ataullah M.K. Jagirdar | Physiological – physical parameters between rural and urban high school girls | 43 |
| 13 | Karan Sunil Jain | An overview on performances of well performed football players in international level tournaments | 45 |
| 14 | Dr. Faruqui Md. Quayyum M.Younus. | India and policy matter of international relations | 49 |
| 15 | Ramesh Tarkram Khandangale | Role of NABARD in Agriculture and Rural Development of India | 56 |
| 16 | Ladhe D.D. Dr.M.K. Ataullah | Influence of 8 weeks strength training porgramme on maximum strength | 59 |
| 17 | Dr.Pandhare.S.M. | A study of role of sports psychology in the enhancement of capacities and sports performance | 62 |
| 18 | Dr.Sanap Bhagchand Maroti | Physical education: a study of skill development and health related fitness | 65 |
| 19 | Mr.Shinde Hemant Trimbakrao | A study of the role of some yoga elements in physical education and sports performance | 68 |
| 20 | Dr.Talekar C.K. | A study of formation and performance of nationalist congress party: political approach | 71 |
| 21 | Dr.Somnath.B.Sanap | After covid? - entrepreneurship | 75 |





18

| | | | |
|---|---|---|---|
| 22 | Dr.Thorwe.R.H. | A study of leadership vision and qualities for librarians | 78 |
| 23 | Dr. Ardale S. D. | Human rights and reality of women's status in india | 80 |
| 24 | Dr.Banjara Dilip Lalu | United nation and human rights: an overview of universal declaration of human rights | 83 |
| 25 | Dr. Rajeshri Apparao Jadhav | Challenges of virtual teaching for students from tribal areas of india | 89 |
| 26 | प्रा. परळकर एस.डी. | ब्रिटीशकालीन सामाजिक सुधारणा– एक अभ्यास | 92 |
| 27 | प्रा.डॉ.सोनवणे जी.एन. | जागतिक तापमान वाढ नियंत्रणाबाबत भारताची भूमिका | 95 |
| 28 | डॉ.मस्के डी.बी. | ग्रंथालय आधुनिकीकरण आणि माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचे महत्व | 98 |
| 29 | डॉ.देशमुख एम.बी. | ग्रामसभा: ग्रामीण विकासातील योगदानाचा समाजशास्त्रीय अभ्यास | 101 |
| 30 | डॉ. कानडे अशोक | अधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान | 105 |
| 31 | डॉ.नंदकुमार कुंभारीकर | आरोग्य प्रशासनासमोरील आव्हाने–एक प्रशासकीय अध्ययन | 108 |
| 32 | डॉ.गोंदकर तुकाराम दत्तात्रय | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे महिला विकास विषयक विचार व योगदान | 111 |
| 33 | डॉ.अशोक लक्ष्मण गोरे | आपत्ती व्यवस्थापन: प्रशासकीय आव्हानाचा अभ्यास | 114 |
| 34 | इंगळे शिवानी मच्छिंद्र | अहमदनगर जिल्ह्यातील पर्यटन क्षेत्रावर covid-19 चा झालेला परिणाम | 117 |
| 35 | प्रा. डॉ. के.एम.नागरगोजे | फिल्डमार्शल सॅम माणेकशा आणि भारत- पाकिस्तान-1971 चे युद्ध | 120 |
| 36 | डॉ.पाटील चारुशीला विजयराव | महाराष्ट्रातील कृषी आधारित लघुउद्योगाचा अभ्यास | 123 |
| 37 | डॉ. बा. आ. साबळे<br>हनुमान अ. रासवे | बदलत्या शैक्षणिक धोरणाचा परिणाम | 125 |
| 38 | *अ रिझावन अ हन्नान*<br>*डॉ.मो अताऊल्ला एम.के.* | *महाराष्ट्रातील खेळाडूंच्या प्रमुख समस्या व खेळ सुधारण्यासाठीचे उपाय* | 128 |
| 39 | प्रा.डॉ.सवाई एम.के. | महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या सामाजिक सुधारणा व स्त्री-शिक्षण विषयक कार्य – एक अभ्यास | 131 |
| 40 | डॉ.प्रा.लोखंडे बी.बी | केंद्र–राज्य संबंध आणि पक्षीय राजकारण | 134 |
| 41 | डॉ. बिडवे मारुती शिवाजीराव | ग्रंथालयाच्या उत्पन्न साधनाची निर्मिती | 137 |
| 42 | किरणकुमार मोहन धिमधिमे | हुंडा–प्रथा,समाज आणि स्त्रिया | 140 |
| 43 | डॉ.शिवाजी गो. दिवाण | केंद्र-राज्य संबंध | 143 |
| 44 | सोनाजी गवई<br>डॉ. बालाजी साबळे | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील आर्थिक विचार:एक अभ्यास | 148 |
| 45 | डॉ.सांगळे भगवान श्रीपती | महाराष्ट्राचे महसूल प्रशासन —एक दृष्टिक्षेप | 151 |
| 46 | डॉ.कैलास ज्ञानोबा सावंत | हैद्राबाद मुक्तीलढयात खळेगावातील स्वातंत्र्य सैनिकांचे योगदान | 156 |
| 47 | डॉ.बालाजी आ साबळे | छत्रपती शिवाजी महाराजांचे कृषी क्षेत्रासाठी आर्थिक योगदान | 159 |
| 48 | डॉ. उलगडे लक्ष्मण काशिनाथ | प्रमुख प्रशासकांची कार्य आणि गुण एक सखोल संशोधनात्मक अभ्यास | 162 |
| 49 | डॉ. रमेश वाघमारे | खोती पध्दत आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर | 164 |
| 50 | प्रा.शिवकुमार उस्तुर्गे | राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक कार्य : एक अभ्यास | 167 |

# हैद्राबाद मुक्तीलढयात खळेगावातील स्वातंत्र्य सैनिकांचे योगदान

प्रा.डॉ.कैलास ज्ञानोबा सावंत
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग प्रमुख
महिला महाविद्यालय,गेवराई ता.गेवराई जि.बीड
Email- kailassawant09@gmail.com

**प्रस्तावना :**

भारतातील प्रातांची पुनर्रचना होण्याच्या अगोदर अस्तित्वात असलेल्या हैद्राबाद संस्थानाचा संस्थापक मीर कमरोद्दीन उर्फ निजाम उलमुल्कने इ.स.1724 मध्ये हैद्राबाद राज्याची स्थापना केली.[1] दक्षिणेच्या इतिहासावर इ.स.1724 ते 1948 पर्यंत सव्वादोनशे वर्ष स्वत:च्या घराण्याचा दक्षिणेमध्ये दबदबा निर्माण केला. या हैद्राबाद संस्थानात मराठवाडा विभागातील औरंगाबाद,बीड,परभणी, नांदेड आणि उस्मानाबाद या जिल्हयांचा समावेश होता. निजाम उलमुल्क अत्यंत धूर्त व व्यवहारवादी असल्यामुळे त्याने सर्वांना बरोबर घेवून आपली सत्ता बळकट केली. त्याच्या उत्तराधिकाऱ्याने निजाम पाचव्यापर्यंत परिधर्म सहिष्णूतेचे वातावरण ठेवले. परंतु निजाम सहाव्यापासून हिंदू धर्मीयावर अन्याय अत्याचार वाढल्याचे दिसते. त्यानंतर दि.29 ऑगस्ट 1911 या दिवशी म्हणजेच वयाच्या 25 व्या वर्षी मीर उस्मान अलिखान बहादूर सातवा निजाम सत्तेवर आला.[2] मीर उस्मान अलिखानच्या चुकीच्या मुस्लीम धार्जिण धोरणामुळे मराठवाडयातील हिंदू समाजात तेढ निर्माण होण्यास प्रारंभ झाल्याचे दिसते. मराठवाडयात इ.स.1911 मध्ये हिंदू बहुसंख्याक असून त्यांच्यावर अन्याय करणारे कायदे अस्तित्वात आणल्यामुळे निजाम राजवटीमध्ये आपण गुलाम असल्याची भावना हिंदू समाजात हळूहळू वाढीस लागल्याचे दिसते.[3]मीर उस्मान अलीखानच्या कारभारावर टिका करताना महादेव काळे लिहितात, "निजामाचे मुस्लीम धार्जिणे धोरण नजराणा पध्दत, सभा आणि वृत्तपत्रे यावर बंदी या कारणामुळे मराठवाडयातील हिंदू समाज अन्यायाने खचून गेल्याचे दिसतो".[4]या अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी मराठवाडयातील जनता पेटून उठल्याची दिसून येते.मराठवाडयातील इतर जिल्हयाच्या मानाने बीड जिल्हातील राजकीय चळवळ इ.स.1936 नंतर सुरु झाल्याची दिसते. या चळवळीचे लोण बीड जिल्हयाच्या इतर तालुक्याप्रमाणे गेवराई तालुक्यात खळेगावसारख्या ग्रामीण भागापर्यंत पोहचल्याचे दिसते.

खळेगावाला प्राचीन व मध्ययुगीन ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे हे गाव बीड जिल्हयातील गेवराई तालुक्यात आहे ते गेवराई शहराच्या पश्चिमेस राष्ट्रीय महामार्ग 52 पासून साधारण 22 कि.मी. अंतरावर असल्याचे दिसते. खळेगाव हे प्रसिध्द शनिचे राक्षसभूवन या गावाच्या दक्षिणेला 17 कि.मी. अंतरावर आहे. या गावाच्या नावाची अख्यायिका सांगितली जाते की, 'खळया यवढा महादेव' ते खळेगाव असे नाव पडल्याचे दिसते. खळेगावात महादेव मंदिराचे मोठया प्रमाणात अवशेष पहावयास मिळतात. तसेच शेतकऱ्यांचे देवस्थान असलेले 'मसोबा' पुजणीय असल्याचे दिसते. तसेच खळेगावात ऐतवारपुरी महाराज व गुरुवर्य शिवाचार्य महाराज यांचे मठ पहावयास मिळतात. या मठावरुन खळेगावातील समाज हा शिवपुजक असल्याचा दिसतो. खळेगावच्या उत्तरेला गोदावरी नदी 17 कि.मी. अंतरावर आहे. 'गोदावरीची उपनदी अमृतानदी ही खळेगावच्या पुर्वोत्तर दिशेने प्रवाहीत होते. तसेच तिथून उमापूर गावापासून पुढे वाहत जात असून धोंडराई जवळून जात सावळेश्वर येथे गोदावरीला जाऊन मिळते.'[5] येथे सर्व समाजाचे लोक राहत असल्याचे दिसतात. प्राचीन व मध्ययुगीन ऐतिहासिक वारसा लाभलेल्या खळेगावात निजाम व निजामाच्या अन्यायकारी रझाकारी संघटनेच्या विरोधात राष्ट्रवादाची ज्योत इ.स.1936 नंतर पेटल्याची दिसते. खळेगावातील स्वातंत्र्य सैनिकांनी हैद्राबाद मुक्ती लढयात सहभाग घेऊन 17 सप्टेंबर 1948 रोजी निजामाच्या वर्चस्वातून मराठवाडयाला मुक्त केल्याचे दिसते. अशा या खळेगावातील कर्तबगार स्वातंत्र्य सैनिकांचा इतिहास अभ्यासकापर्यंत व समाजापर्यंत जावा हा या संशोधन पेपरचा उददेश आहे.

**उध्दिष्टये :** प्रस्तुत संशोधन पेपरसाठी पुढील उध्दिष्टये

1. खळेगावातील प्राचीन व मध्ययुगीन इतिहासाचा मागोवा घेणे.
2. हैद्राबाद मुक्ती लढयात खळेगावातील स्वातंत्र्य सैनिकांच्या कामगिरीचा अभ्यास करणे.

**गृहितके :** प्रस्तुत संशोधन पेपरसाठी पुढील गृहितके

1. खळेगावाला प्राचीन व मध्ययुगीन इतिहास लाभलेला आहे.
2. हैद्राबाद मुक्ती लढयात खळेगावातील स्वातंत्र्य सैनिकांचे योगदान महत्त्वाचे राहिले.

**संशोधन पध्दती :** प्रस्तुत शोध निबंधाचा अभ्यास करण्यासाठी ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा उपयोग करण्यात आलेला आहे.

**हैद्राबाद मुक्ती लढयात खळेगावातील स्वातंत्र्य सैनिकांचे योगदान :**

**1) आहेर बाबा मायानी :** आहेर बाबा यांनी निजाम सरकारच्या विरोधात इ.स.1947 मध्ये साष्टी चकलांबा गावी राष्ट्रीय ध्वज पोलिस स्टेशनसमोर लावल्याने त्यांना पकडून खटला भरण्यात आला. तसेच त्यांनी एक वर्ष सक्त मजुरीची शिक्षा आणि शंभर रुपये दंड आकारण्यात आल्याचे दिसते. त्यांनी औरंगाबाद जेलमध्ये शिक्षा पूर्ण केली. त्याबद्दल महाराष्ट्र शासनाकडून त्यांना ताम्रपट व मासिक पेन्शन दोनशे रुपये दिल्याचे दिसते.

**2)आहेर नामदेव बळवंत :** आहेर नामदेव यांनी निजाम सरकारच्या विरोधात इ.स.1947 मध्ये बीड कोर्टासमोर झेंडावदन केल्याने त्यांना एक वर्ष सक्त मजूरी व शंभर रुपये सक्तीने दंड वसूल करण्यात आल्याचा दिसतो. त्याबद्दल त्यांना महाराष्ट्र शासनाकडून सन्मानपत्र व दोनशे रुपये मासिक पेन्शन देण्यात आल्याचे दिसते.

**3)आहेर बाजीराव अण्णासाहेब :** आहेर बाजीराव यांनी प्राथमिक शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर खळेगावात निजाम सरकारच्या विरोधात झेंडावंदन व प्रभात फेऱ्या काढल्याच्या दिसतात. तसेच त्यांनी बीड कोर्टावर झेंडा फडकावल्याचा दिसतो. त्यामुळे त्यांना इ.स.1947 मध्ये दोन वर्षाची सक्त मजूरीची शिक्षा आणि एक हजार रुपये दंड करण्यात आल्याचा दिसतो. त्यांनी बीड,औरंगाबाद व गुलबर्गा जेलमध्ये शिक्षा पूर्ण केल्याचे दिसते. त्याबददल महाराष्ट्र सरकारने त्यांना सन्मानपत्र व दोनशे पन्नास रुपये मासिक पेन्शन सुरु केल्याचे दिसते.

**4)आहेर भुजंग दिनानाथ :** आहेर भूजंगराव यांनी प्राथमिक शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर निजाम सरकारच्या विरोधात चकलांबा पोलिस स्टेशनसमोर झेंडा सत्यागृह केल्याने त्यांना 10 ऑक्टोबर 1947 रोजी अटक झाली. तसेच त्यांना एक वर्ष सक्त मजूरी आणि शंभर रुपये दंड आकारण्यात आल्याचा दिसतो. त्याबद्दल त्यांना महाराष्ट्र सरकारने सन्मानपत्र व दोनशे पन्नास रुपये मासिक पेन्शन दिल्याचे दिसते.

**5)आहेर महादेव कुंडलिक :** आहेर महादेव यांनी निजाम सरकारच्या विरोधात चकलांबा पोलिस स्टेशनसमोर कॉंग्रेसचा तिरंगा ध्वज फडकावून सत्याग्रह केल्याने त्यांना 10 ऑक्टोबर 1947 रोजी दोन वर्ष सक्तमजूरीची शिक्षा झाल्याची दिसते. त्याबद्दल त्यांना महाराष्ट्र सरकारने सन्मानपत्र देवून दोनशे पन्नास रुपये मासिक पेन्शन देण्यात आल्याचे दिसते.[6]

**6)आहेर आबा मायांजी :** आहेर आबा यांनी निजाम सरकारच्या विरोधात इ.स.1947 मध्ये स्वातंत्र आंदोलनात भाग घेतल्याने त्यांना सहा महिने कारावासाची शिक्षा झाल्याची दिसते. ती त्यांनी औरंगाबाद सेट्रंल जेलमध्ये पूर्ण केली. याबद्दल त्यांना महाराष्ट्र सरकारने सन्मानपत्र व दोनशे पन्नास रुपये मासिक पेन्शन दिल्याचे दिसते.

**7)आहेर बाजी अण्णा :** आहेर बाजी यांनी चौथीचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर निजाम सरकारच्या विरोधात इ.स.1947 मध्ये स्वातंत्र्य आंदोलनात भाग घेतल्याने बीड कोर्टाने त्यांना सहा महिने कारावासाची शिक्षा दिल्याची दिसते. ती शिक्षा त्यांनी औरंगाबाद कारागृहात पूर्ण करुन एक हजार रुपये दंड भरल्याचा दिसतो. त्याबद्दल त्यांना महाराष्ट्र सरकारने सन्मानपत्र व मासिक पेन्शन दिल्याचे दिसते.

**8)आहेर दिगांबर शंकरराव :** आहेर दिगांबरराव यांनी प्राथमिक शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर खळेगावात बारा सत्याग्रहीसह निजाम सरकारच्या विरोधात त्यांनी झेंडावंदन व प्रभात फेऱ्या काढल्याच्या दिसतात. तसेच त्यांनी बीड कोर्टासमोर इ.स.1947 मध्ये झेंडावंदन केल्यामुळे त्यांच्यावर खटला भरुन एक वर्ष सक्त मजूरीची शिक्षा दिल्याची दिसते. या कामगिरीमुळे त्यांना महाराष्ट्र सरकारकडून सन्मानपत्र व दोनशे पन्नास रुपये मासिक पेन्शन सुरु करण्यात आल्याचे दिसते.

**9)आहेर भूजंग दिनानाथ :** आहेर भूजंग यांनी चौथीचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर निजाम सरकारच्या विरोधात इ.स.1947 मध्ये स्वातंत्र्य लढयात भाग घेतल्याचा दिसतो. या सहभागामुळे त्यांना गेवराई कोर्टाने शिक्षा ठोठावली. त्यांनी ती शिक्षा औरंगाबाद सेट्रंल जेलमध्ये पूर्ण केल्याची दिसते. त्याबद्दल त्यांना महाराष्ट्र सरकारने सन्मानपत्र व मासिक पेन्शन दिल्याचे दिसते.

**10)आहेर विठ्ठल श्रीपती :** आहेर विठ्ठल यांनी पहिली पर्यंतचे शिक्षण पूर्ण केल्याचे दिसते. त्यानंतर निजाम सरकारच्या विरोधात इ.स.1947 मध्ये टाकली येथे 32 लोकांसह झेंडा सत्याग्रह व कोर्टासमोर घोषणा दिल्याबद्दल त्यांना अटक झाली. तसेच त्यांना सहा महिने कारावासाची शिक्षा दिल्याचे दिसते. त्यांनी ती शिक्षा औरंगाबाद सेंट्रल जेलमध्ये पूर्ण केली. त्याबद्दल त्यांना महाराष्ट्र सरकारकडून सन्मानपत्र व दोनशे पन्नास रुपये मासिक पेन्शन देण्यात आल्याचे दिसते.[7]

**11)आहेर संतराम यादव :** आहेर संतराम यांनी इयत्ता तिसरे पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर निजाम सरकारच्या विरोधात इ.स.1947 मध्ये स्वातंत्र्य लढयात भाग घेतल्यामुळे त्यांना बीड कोर्टाने सहा महिने कारावासाची शिक्षा फार्मावली व एक हजार रुपये दंड ही केल्याचा दिसतो. त्यांनी ती शिक्षा औरंगाबाद सेंट्रल जेलमध्ये पूर्ण केली. त्याबद्दल त्यांना महाराष्ट्र सरकारने सन्मानपत्र व दोनशे रुपये मासिक पेन्शन दिल्याचे दिसते.[8]

**12)काळे राजाराम दगडू :** काळे राजाराम दगडू यांनी दुसरीपर्यंत शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर इ.स.1947 मध्ये निजाम सरकारच्या विरोधात स्वातंत्र्य लढयात भाग घेतल्यामुळे त्यांना एक वर्षाची शिक्षा व एक हजार रुपये दंड आकारण्यात आल्याचे दिसते. त्यांनी औरंगाबाद सेंट्रल जेलमध्ये शिक्षा पूर्ण केली. त्याबद्दल त्यांना महाराष्ट्र सरकारकडून सन्मानपत्र व दोनशे पन्नास रुपये मासिक पेन्शन मिळाल्याचे दिसते.[9]

**13)शिंदे यादवराव तुकाराम :** शिंदे यादवराव यांनी प्राथमिक शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी निजाम सरकारच्या विरोधात खळेगावात झेंडा वंदन व फेऱ्या काढल्याच्या दिसतात. इ.स.1947 साली बीड कोर्टावर तिरंगा ध्वज लावल्यामुळे त्यांना पकडण्यात आले व दोन वर्षाची सक्त मजूरीची शिक्षा व एक हजार रुपये दंड ठोठावण्यात आल्याचे दिसते. त्यांनी औरंगाबाद सेंट्रल जेलमध्ये शिक्षा पूर्ण केली. त्याबद्दल त्यांना महाराष्ट्र शासनाकडून सन्मानपत्र व दोनशे रुपये मासिक पेनश्न देण्यात आल्याचे दिसते.[10]

**निष्कर्ष :**या संशोधनाअंती काही निष्कर्ष काढलेले असून ते निष्कर्ष पुढीलप्रमाणे सांगता येतील.

1) खळेगावाला प्राचीन व मध्ययुगीन ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे.
2) खळेगावात महादेव मंदिराचे मोठया प्रमाणात अवशेष पहावयास मिळतात. तसेच 'खळया ऐवढा महादेव' यावरुन खळेगाव हे नाव पडल्याचे दिसते.
3) खळेगावात ऐतिवारपुरी महाराज व गुरुवर्य शिवाचार्य महाराज यांचे मठ असल्याचे दिसतात. यावरुन खळेगाव 'शिवपूजक' असल्याचे दिसते.
4) खळेगाव अमृता नदी काठी वसलेले दिसते.
5) हैद्राबाद संस्थानातून मराठवाडा मुक्त होण्यास खळेगावच्या स्वातंत्र्य सैनिकांनी निजाम व रझाकारी संघटनेच्या विरोधात लढा दिल्याचा दिसतो.
6) हैद्राबाद संस्थानातून मराठवाडा मुक्त होण्यास खळेगावच्या स्वातंत्र्य सैनिकांचे योगदान राहिल्याचे दिसते.

**सारांश :**वरील विषयाच्या परिप्रेक्षात हैद्राबाद मुक्ती लढयात गेवराई तालुक्यातील खळेगावातील स्वातंत्र्य सैनिकांचे योगदान महत्त्वपूर्ण राहिल्याचे दिसते. स्वातंत्र्य सैनिकांनी सर्वस्वाचा त्याग करुन निजाम व रझाकार संघटनेला शह दिल्याचा दिसतो. त्यांच्या या योगदानामुळे 17 सप्टेंबर 1948 रोजी मराठवाडा निजामाच्या जोखडातून मुक्त झाल्याचा दिसतो.

**संदर्भसूची :**

1) इम्पीरियल गॅझेटर ऑफ इंडिया,पोव्हिशिअल सिरिज, हैद्राबाद स्टेट सुप्रिटेंड ऑफ गव्हर्न्मेंट प्रिंटिग, कलकत्ता,1909, पृष्ठ 15
2) संशोधक त्रैमासिक, इतिहासाचार्य राजवाडे संशोधक मंडळ,धुळे वर्ष-51, अंक-2 जून आणि सप्टेंबर, 1983,पृष्ठ 29
3) देऊळगावकर कि.पा.,(अनु), हैद्राबाद संग्रामाच्या आठवणी, स्वामी रामानंद तीर्थ, पृष्ठ 64.
4) डॉ.कुटे भ.ग.,(संपा), स्वातंत्र्य सैनिक चरित्रकोश,महाराष्ट्र राज्य मराठवाडा विभाग, महाराष्ट्र शासन,मुंबई,2011, पृष्ठ-15
5) पगडी सेतू माधवराव,(संपा),बीड जिल्हा गॅझेटिअर, बॉम्बे गॅझेटिअर, गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र,मुंबई, 1985, पृष्ठ 5,6
6) डॉ.कुंटे म.ग., (संपा), स्वातंत्र्य सैनिक चरित्रकोश, उपरोक्त,पृष्ठ 7
7) कित्ता, पृष्ठ 18
8) कित्ता, पृष्ठ 19
9) कित्ता, पृष्ठ 44
10) कित्ता, पृष्ठ 374